# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## क क्षेत्रीय कार्यालय

## कार्यपत्रिका क्रमांक-१०

## सभावृत्तांत

दि.- ०२/१२/२०१५ वेळ –दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि. ०२/१२/२०१५ रोजी दुपारी ३:०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) **मा. मोटे किरण बाळासाहेब** **सभापती**
२) मा.ननवरे जितेंद्र बाबा
३) मा.सावळे सिमा रविंद्र
४) मा.पालांडे सुजाता सुनिल
५) मा.सौ.पानसरे अमिना महंमद
६) मा.कदम सदगुरु महादेव
७) मा.कैलास महादेव कदम
८) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
९) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०) मा.शेंडगे आशा सुखदेव
११) मा.संजय केशवराव काटे
१२) मा.सतिश सदाशिव काटे स्वीकृत सदस्य
१३) मा.गणेश आनंदराव ढोरे ------“--------
१४) मा.हमीद नवाब शेख ------“--------

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. फुंदे डि.एम.-क्षेत्रीय अधिकारी, मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.संजय खाबडे- कार्यकारी अभियंता विदयुत,मा.दिलीप सोनवणे-कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.जयंत बरशेट्टी- कार्यकारी अभियंतापापु,मा.प्रदीप पुजारी - कार्यकारी अभियंता झोनिपु, मा.विशाल कांबळे- उपअभियंता स्थापत्य, मा.शिंदे- उपअभियंता स्थापत्य, मा.वायकर- उपअभियंता स्थापत्य,मा.जावळे -उपअभियंता (पापु), मा.बोत्रे- उपअभियंता स्थापत्य,मा.सोनवणे-उपअभियंताविदयुत,मा.रविंद्र भोकरे- सहा.आरोग्याधिकारी,मा.उगले-लेखाधिकारी,श्री.क्षिरसागर-कनिष्ठ अभियंता स्थापत्य, हे अधिकारी उपस्थित होते.

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक-१) नामकरणाबाबत-मा.अतुल शितोळे,मा.सदगुरु कदम,मा.गणेश ढोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-२) नामकरणाबाबत-मा.अतुल शितोळे,मा.सदगुरु कदम,मा.गणेश ढोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-३) नामकरणाबाबत-मा.अतुल शितोळे,मा.सदगुरु कदम,मा.गणेश ढोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) प्रभाग क्र.६१ व ६२ मधील विविध सोसायटयांच्या बाहेर सोसायटीचे नामफलक लावणे बाबत-मा.सतिश काटे, मा.सदगुरु कदम, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकामध्ये विदयुतविषयक कामांकरिता अंतर्गत तरतुद वर्ग करणेबाबत...

विषय क्रमांक-६) प्र.क्र.६३ मधील स्वच्छतागृह व पाण्याचा टाकीचा ओटा पाडणेबाबत-मा.किरण मोटे व मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

दि.०४/११/२०१५ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ९ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

ठराव क्रमांक- १५५ विषय क्रमांक- १
दिनांक- २/१२/२०१५ विभाग-
सुचक- मा. .अतुल शितोळे अनुमोदक- मा.सदगुरु कदम
संदर्भ- मा.अतुल शितोळे,मा.सदगुरु कदम,मा.गणेश ढोरे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५९ (सांगवी) येथील नियोजित मधुबन सोसायटी मधील सर्व्हे नं.२६ आरक्षण क्र.३१६ येथील नियोजित उदयानाला **"छत्रपती शिवाजी महाराज उदयान"** व प्रवेशद्वाराला **"भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर"** यांचे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-------

ठराव क्रमांक- १५६ विषय क्रमांक- २
दिनांक- २/१२/२०१५ विभाग-
सुचक- मा. .अतुल शितोळे अनुमोदक- मा.सदगुरु कदम
संदर्भ- मा.अतुल शितोळे,मा.सदगुरु कदम,मा.गणेश ढोरे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५९ (सांगवी) येथील गजानन महाराज मंदिरासमोर नियोजित मोकळया जागेतील व्यासपीठाला **"कै.शिवाजीराव भगवंता ढोरे"** यांचे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला

------

ठराव क्रमांक- १५७ विषय क्रमांक- ३
दिनांक- २/१२/२०१५ विभाग-
सुचक- मा. .अतुल शितोळे अनुमोदक- मा.सदगुरु कदम
संदर्भ- मा.अतुल शितोळे,मा.सदगुरु कदम,मा.गणेश ढोरे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५९ (सांगवी) येथील मधुबन सोसायटी येथील रस्ता क्र.९ यांस **"कै.शिवाजीराव गेणुजी ढोरे पथ"** असे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला

------

ठराव क्रमांक- १५८ विषय क्रमांक- ४
दिनांक- २/१२/२०१५ विभाग-
सुचक- मा. सदगुरु कदम अनुमोदक- मा.अमिना पानसरे
संदर्भ- मा.सतिश काटे, मा.सदगुरु कदम, मा.अमिना पानसरे यांचा प्रस्ताव.

दापोडी प्रभाग क्र.६१ व ६२ मध्ये विविध गृहरचना संस्था असुन त्या सर्व सोसायटयांच्या बाहेर संस्थेचा नामफलक लावणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला

------

ठराव क्रमांक- १५९ विषय क्रमांक- ५
दिनांक- २/१२/२०१५ विभाग-
सुचक- मा. आशा शेंडगे अनुमोदक- मा.सीमा सावळे
संदर्भ- मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांचे जा.क्र.कक्षे/वि/जा/८९०/२०१५ दि.

| अ. क्र. | उपलेखाशिर्षाचेनाव | पान.क्र. | अ. क्र. | सन २०१५-१६ चा मुळअंदाज | वाढ | घट | एकुण १५-१६ सुधारीत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| लेखाशिर्ष - | किरकोळ दुरूस्ती व देखभाल | | | | क क्षेत्रिय कार्यालय | | |
| १ | कासारवाडी प्र क्र ६१ मधील स्ट्रीटलाईटची सन २०१४-१५ मध्ये देखभाल दुरुस्ती करणे. | ७२० | २३ | ३००००० | ० | १२५०० | २८७५०० |
| २ | कासारवाडी प्र क्र ६२ मधील स्ट्रीटलाईटची सन २०१४-१५ मध्ये देखभाल दुरूस्ती करणे.. | ७२० | २४ | ३५०००० | ० | १३००० | ३३७००० |
| ३ | कासारवाडी प्र क्र ६३ मधील स्ट्रीटलाईटची सन २०१४-१५ मध्ये देखभाल दुरूस्ती करणे.. | ७२० | २५ | ३१५००० | २०००० | ० | ३३५००० |
| ४ | कासारवाडी प्र क्र ६४ मधील स्ट्रीटलाईटची सन २०१४-१५ मध्ये देखभाल दुरूस्ती करणे.. | ७२० | २६ | ३१५००० | ८४५०० | ० | ३९९५०० |
| ५ | कासारवाडी उप विभागातील हायमास्ट दिव्यांची देखभाल दुरूस्तीकरणे.. | ७२० | ३१ | २१०००० | ० | १९५०० | १९०५०० |
| ६ | कासारवाडी उप विभागातील इमारती, शाळा, कार्यालय इ. ठिकाणच्या विद्युतीकरणाची सन २०१५-१६ मध्ये देखभाल दुरूस्ती करणे. | ७२१ | ५२ | २५०००० | ३५०००० | ० | ६००००० |
| ७ | कासारवाडी उप विभागातील इमारती मधिल जनरेटरची सन २०१५-१६ करीता वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे.. | ७२२ | ५८ | १००००० | ० | ११५०० | ८८५०० |
| ८ | कासारवाडी उप विभागातील इमारती मधिल इनव्हर्टरची सन २०१५-१६ करीता वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे.. | ७२२ | ६१ | १४८००० | ० | १४८००० | ० |
| ९ | कासारवाडी उप विभागातील हायमास्टची सन २०१५-१६ करीता वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे.. | ७२२ | ६४ | २५०००० | ० | १५०००० | १००००० |
| १० | कासारवाडी उप विभागातील शाळा इमारती मधिल बोअरवेल पंपाची सन २०१५-१६ करीता वार्षिक देखभाल दुरूस्ती करणे. | ७२३ | ६९ | २००००० | ० | १००००० | १००००० |
| | मा.क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय यांनी शिफारस केलेप्रमाणे---- | | | | | | |
| | एकुण | | | २४३८००० | ४५४५०० | ४५४५०० | २४३८००० |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक- १६०  
विषय क्रमांक- ६  
दिनांक- २/१२/२०१५  
विभाग-  
सुचक- मा. किरण मोटे  
अनुमोदक- मा.सुजाता पालांडे  
संदर्भ- मा.किरण मोटे,मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६३ कासारवाडी येथील छत्रपती शाहू महाराज इंग्लिश मिडियम शाळेलगत पडीक स्वच्छतागृह व पाण्याच्या टाकीचा ओटा आहे स्वच्छतागृह व पाण्याच्या टाकीच्या बांधकामामुळे राडारोडा कचरा पडलेला आहे यामुळे विषारी साप फिरत असतात त्यामुळे तातडीने स्वच्छतागृह व पाण्याच्या टाकीचा ओटा पाडणेत यावा. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-  
(मोटे किरण बाळासाहेब )  
सभापती क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका



प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा) क प्रभाग समिती

क क्षेत्रीय कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कक्षेका/कावि/सभा/१६८/२०१५
दिनांक-०८/१२/२०१५

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.